# महाराष्ट्र शासन

## जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, नागपूर

दुरध्वनीक्रमांक : (०७१२)२९५००३०
ई-मेल:csnagpur2019@gmail.com

नेल्सन चौक, छिंदवाडा रोड, मानकापूर, नागपूर-४४००३०
जा.क्र./जिशचि/सारुना/RBSK/वाहन/ई-दरपत्रके/ 8965 /२०२५
दि: 03 SEP 2025

ई- दरपत्रके जाहीरात

विषय:- राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत तात्पुरत्या स्वरुपात भाडे तत्वांवर T-Permit वाहनाचे दरपत्रके सादर करण्याबाबत.

संदर्भ:-१) मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,कुटंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे यांचे पत्र क्रं.राकुकका/आरबीएसके/कक्ष-१५क/नस्ती क्रं/RBSK च्या वाहनाबाबत/ ३४३३३-३७२/२०२५ दि.३१/७/२०२५

२) मा. सहसंचालक (तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्रं. राआसो/ आरबीएसके वाहने/२७६२६-७३०/२०२३ दि.०१/०६/२०२३

३)मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नागपूर यांची मंजुर नस्ती दि.७/८/२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते की, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय नागपूर येथे तात्पुरत्या स्वरुपात भाडे तत्वांरवर T-Permit वाहनाची आवश्यकता आहेत. त्याअनुषंगाने खालिल प्रमाणे कार्यालयाद्वारे दिलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन दरपत्रके मागविण्यात येत आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम संपुर्ण जिल्हयात राबविण्यात येत असुन खालील तक्त्याप्रमाणे एकुण ३८ वाहनाची जिल्हा रुग्णालय व उपजिल्हा तसेच ग्रामीण रुग्णालय स्तरावर आवश्यकता आहे. त्यामुळे दरपत्रके सादर करतांना बंद पाकिटात दिलेल्या दिनांक व वेळेच्या आत जिल्हयासाठी जिल्हास्तरावर व उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालयासाठी उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालय स्तरावर दरपत्रके वैद्यकिय अधिक्षक यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

सदर दरपत्रके बंद पॉकीटात दि.०४/०९/२०२५ ते दि.१५/०९/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत जिल्हा सामान्य रुग्णालय, नागपूर तसेच उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालय येथे दरपत्रके सादर करावे.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत खालीलप्रमाणे वाहनाची आवश्यकता आहे.

| अं.क्र | जिल्हा/उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालयाचे नाव | कार्यरत पथके | आवश्यक वाहन | वाहनाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा रुग्णालय, नागपूर | 11 | 11 | सदर वाहने ही फक्त आरबीएसके कार्यक्रमासाठी वापरण्यात येणार असुन सर्व वाहने हि ४+१ सीट असलेली बंद बॉडी या तत्सम स्वरुपातील व Engine Capacity १००० CC च्या वर असणे आवश्यक आहे. सर्व वाहने ही मागील ८ वर्ष कालावधीपेक्षा जुनी नसावी. तसचे आरबीएसके कार्यक्रमासाठी वापरण्यात येणारे वाहन हे T-Permit नोंदणीकृत व आरटीओकडीले सर्व परवाने आणि वाहनाचा पुर्ण विमा भरलेला असणे आवश्यक आहे. |
| 2 | उपजिल्हा रु. कामठी | 3 | 3 | |
| 3 | उपजिल्हा रु. रामटेक | 2 | 2 | |
| 4 | ग्रा.रु.नरखेड | 2 | 2 | |
| 5 | ग्रा.रु.मौदां | 2 | 2 | |
| 6 | ग्रा.रु.हिंगणा | 3 | 3 | |
| 7 | ग्रा.रु.कळमेश्वर | 2 | 2 | |
| 8 | ग्रा.रु.भिवापूर | 2 | 2 | |
| 9 | ग्रा.रु.उमेरड | 2 | 2 | |
| 8 | ग्रा.रु.पारशिवनी | 2 | 2 | |
| 9 | ग्रा.आ.प्र.के.सावनेर | 1 | 1 | |
| 12 | ग्रा.रु.पाटणसावंगी | 2 | 2 | |
| 13 | ग्रा.रु.काटोल | 2 | 2 | |
| 14 | ग्रा.रु.कुही | 2 | 2 | |
| एकुण | | 38 | 38 | |

राज्यस्तरावरुन निविदा प्रकिया होईपर्यत तात्पुरत्या स्वरुपात वरीलप्रमाणे एकुण ३८ वाहनाची (T-Permit) आवश्यकता आहे. याकरिता खालीप्रमाणे अटी व शर्ती देण्यात येत आहे.

अटी व शर्ती

१) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम संपुर्ण जिल्हयात राबविण्यात येत असुन वरील तक्त्याप्रमाणे एकुण ३८ वाहनाची जिल्हा रुग्णालय व उपजिल्हा तसेच ग्रामीण रुग्णालय स्तरावर आवश्यकता आहे. त्यामुळे दरपत्रके सादर करतांना बंद पाकिटात दिलेल्या दिनांक व वेळेच्या आत जिल्हयासाठी जिल्हास्तरावर व उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालयासाठी उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालय स्तरावर दरपत्रके वैद्यकिय अधिक्षक यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

२) जाहिरात प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासुन सुट्टीचे दिवस वगळता ७ दिवसाच्या आत बंद पाकिटात दरपत्रके त्या-त्या संस्थास्तरावर सादर करावी.

३)वाहन पुरवठा धारकाकडे नोंदणीकृत ट्रॅव्हल्स एंजन्सीचा गुमास्ता, पॅन नंबर, टॅन नंबर, G.S.T. नंबर इत्यांदी असणे बंधनकारक आहे व दरपत्रके सादर करतांना सदर दस्ताऐवज सोबत जोडणे आवश्यक आहे.

४)शासकिय कार्यालयात तसेच आरबीएसके कार्यक्रमांसाठी वाहन सेवा पुरविल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

५)वाहन रुजु करुन घेण्याअगोदर जिल्हास्तरावरुन वाहने विभागीय परिवहन विभाग (आरोग्य) यांचेकडुन तपासुन घेणे आवश्यक राहिल व त्याचे फिटनेस प्रमाणपत्र सादर केल्यानंतर वाहने प्रत्येक्षात रुजु करुन घेण्यात येईल.

६)राज्यस्तरावरुन निधीच्या उपलब्धतेनुसार वाहनाचे देयके अदा करण्यात येईल.

७)सदरची वाहने उपलब्ध करुन घेतांना शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ व इतर वेळोवळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

८)मासिक १५०० कि. मी. व रु.२९७५०/- च्या मर्यादित सदरची कार्यवाही करण्यात येईल.

९)सर्व वाहने ही ४+१ सिट असलेली, स्विप्ट डिझायर,सुमो, बोलेरो, मारुती इको, इंडिगो, एक्सेट, इत्यादी यासारख्या तत्सम स्वरुपातील असणे आवश्यक आहे.

१०)वाहनावर NHM विभागाचा लोगो लावणे बंधनकारक राहिल. (सेवार्थ)

११)R.T.O कडील सर्व परवाने व वाहनाचा पुर्ण विमा भरलेला असणे आवश्यक आहे.

१२)वाहनाचे इंधन, वंगण, दुरुस्ती व वाहनचालकाचा खर्च (वेतन, भत्ते, प्रवास) सर्व पुरवठा धारकास अदा करावा लागेल.

१३) अपघात, किरकोळ अथवा कोणत्याही स्वरुपाची दुरुस्ती व देखभाल करणे, इत्यादी बाबत पुरवठाधारकाची जबाबदारी असेल.

१४)शाळा व अंगणवाडी तपासणी अथवा मुलांना संदर्भ सेवा देण्याकरीता वाहनाचा वापर करण्यात येईल.

१५)वाहन चालकाचे वय १८ ते ६० वर्ष असावे. तसचे वाहन परवाना व वैद्यकियदृष्टया योग्य असणे आवश्यक आहे.

१६)मुख्यालयात वाहन कमीत-कमी ९ तास सेवेत असणे आवश्यक आहे.

१७)वाहन फिरस्तीवर असतांना बंद पडल्यास पथकाला पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्यात जबाबदारी वाहन पुरवठाधारकाची राहिल.

१८)या कार्यालयास कमी दराने प्राप्त (बाजारभावापेक्षा)दरपत्रके सादर करणाऱ्या सेवा पुरवठाधारकास पुरवठा आदेश देण्यात येईल.

१९) वाहनाचे देयके हे PFMS Online द्वारे अदा करण्यात येईल.

२०) वाहन फिरस्तीवर असतांना टोल टॅक्स वाहनधाकरला भरावा लागेल.

२१)शासकिय सुट्टीच्या दिवशी सुध्दा आवश्यकतेनुसार वाहनाचा वापर करण्यात येईल.

जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा सामान्य रुग्णालय नागपूर.